ॐ

# अध्याय सातवा

१ ''चित्त ठेवुनी माझ्या ठायीं प्रेम-भरानें निरुतें
आश्रय माझा घेउनी सदा योग साधितां येथें १
संपूर्णपणें निश्चित जेणें जाणशील तूं मातें''
योगेश्वर तो म्हणे, 'सांगतों पार्था, श्रवण करीं तें. २

२ तुज संपूर्ण ज्ञान वर्णितों हें विज्ञानासहित
जाणतां चि जें जाणावेंसें पुढें न उरतें येथ ! ३
पूर्ण लोपते जाणीव जिथें न च तर्काची धांव
मनें कल्पितां न ये तत्त्वतां तया 'ज्ञान' हें नांव ४
तरी स्वभावें जें सामावें मन-बुद्धीच्या प्रांतीं
प्रापंचिक जें सकल तयातें 'विज्ञान' असें म्हणती ५
त्या विज्ञानीं 'अज्ञानपणें' सत्य-बुद्धि न च ठेवीं
ज्ञान-रूप तूं होउनी स्वयें स्व-रूप-सिद्धी मिळवीं ६

३ सहस्त्रांतुनी विरळा कोणी झटे मोक्ष-सिद्ध्यर्थ
झटणारांत हि कुणि एखादा जाणे मजसि यथार्थ ७
४ पृथ्वी पाणी आणिक अग्नी वायु पांचवें गगन
मन बुद्धि अहंकार अशी ही प्रकृति अष्टधा भिन्न ८
५ अपरा माझी ही असे; दुजी परा प्रकृति तूं जाण
जीव-भूत जी असे चि धरिलें जिनें जगत् संपूर्ण ९
६ पारा प्रकृति ही सूक्ष्म आणि ती कनिष्ठ अपरा स्थूळ
ह्यांजपासुनी मी चि निर्मिली भूत-सृष्टि ही सकळ १०
प्रकृतिद्वारा सर्व जगातें मूळ मध्य शेवट मी
म्हणुनि तयाचें अभेद-नातें असे चि जडलें ब्रह्मीं ! ११
७ मजहुनी हि जें श्रेष्ठसें दुजें न च धनंजया, कांहीं
मणि-गण सूत्रीं तसें ओंविलें जग हें माझ्या ठायीं १२
८ जलांत रस मी शब्द-ब्रह्मीं ॐकार चि सर्वांशीं
प्रभा रवि-शशीं मी आकाशीं शब्द, पराक्रम पुरुषीं १३
९ पुण्य गंध मी पृथ्वींत असें तसें तेज अग्नींत
सर्वा भूतीं जीवन तें मी तप हि तपोवृद्धांत १४
१० जाण सनातन विश्व-बीज मी अनादि आणिक सहज
असें बुद्धि मी धीमंतांची तेजस्व्यांचें तेज १५
११ बलवंतांचें बल मी साचें कामासक्ति-वियुक्त
धर्म्य काम तो मी चि भारता, असें प्राणिमात्रांत १६

१२ मदाश्रयें ते सात्त्विक तैसे राजस तामस तिन्ही
भाव राहती माझ्या ठायीं तयांत परि मी नाहीं १७

जळांत होती बुडबुडे किती दिसती चि जळावरते
परी बुडबुड्यांमध्यें पाहतां काय राहतें जळ तें ? १८

अग्निपासुनी धूर जाहला धुरांत न च तो राहे
तद्वत् पाहें मद्विकार हे परी विकारीं नोहें ! १९

१३ जग हें सगळें असे मोहिलें त्रिगुणात्मक भावांनीं
मज न जाणतें अविनाशातें गुणातीत मी म्हणुनी २०

आशा ममता धरुनि अहंता भ्रांत जाहले प्राणी
मजसि विसरले माया-योगें जीव-दशा पावोनी २१

१४ त्रि-गुण-मयी मम दैवी माया तरावया ही कठिण
जाती तरुनी परि जे कोणी मला चि येती शरण २२

दुस्तर माया-सरिता पावे उगम ब्रह्म-गिरींत
संकल्प-जळें पुढतीं प्रबळे भूत-सृष्टि-रूपांत २३

त्रि-गुण-मेघ-जल-वर्षाव-भरें भ्रांति-महापूरांत
यम-नियमांचीं जाती नगरें वाहुनि निमिषार्धांत २४

क्षुधितसे किती पहा तळपती कामादि महा-मीन
प्रबळ होउनी गिळिती छळिती मनुजा करिती दीन २५

दुस्तर माया तयावयातें उपाय जे जे करिती
मद्भभक्तिविना ते चि अर्जुना, अपाय येथें होती ! २६

तन-मन-धन तें अर्पुनि मातें भाव-भक्तिनें भजले
भक्त जाणते एक-निष्ठ ते माझी माया तरले २७

१५ शरण न येती मज मूढ-मती नराधम दुराचरणी
निज-मायेनें भ्रांत जाहले आसुर-भाव धरोनी २८

विवेक नुरला तयां जाहला अहंकार-संचार
म्हणुनी पार्था, पडे सर्वथा निज-बोधाचा विसर २९

विषयीं रमती शुद्ध न धरिती संयमनाची चित्तीं
अधोगतीची लाज नेणती नर-देहाची महती ३०

१६ भजती मातें पार्था, नर ते चतुर्विध सदाचरणी
आर्त आणखीं जिज्ञासु तसे जे अर्थार्थी ज्ञानी ३१

'आर्त' पोळला जो भक्त भला इथे त्रि-विध तापांनीं
म्हणे 'सोडवी' सदा आळवी मातें करुणा-वचनीं ३२

मत्स्वरूप तें जाणायातें इच्छी अंतःकरणीं
'जिज्ञासु' भला तोचि जाहला मद्भक्त असें मानीं ३३

गुरु-निर्दिष्ट क्रमी पंथ जो परमार्थ चि लक्षून
दक्ष राहिला मद्भक्त भला 'अर्थार्थी' तो जाण ३४

मजसि तत्त्वतां जाणुनी स्वतां मत्स्वरूप होवोनी
जगीं विहरतो नित्य भजे तो मद्भक्त भला 'ज्ञानी' ३५

१७ नित्य जोडला एक-निष्ठ तो असे श्रेष्ठ सर्वांत
मी अत्यंत प्रिय त्यासि तसा तो प्रिय मज अत्यंत ! ३६

अनन्य सहजें निरंतर भजे मी चि होउनी मातें
असुनी देही आत्म-रूप तो त्यजी देह-भावातें ३७

१८ गमती मातें भले सर्व ते उदार चारी जाण
परी त्यांतुनी भक्त ज्ञानी मानीं जीव-प्राण ३८

योग-युक्त तो मला पावतो सर्वोत्तम गति मीच
जाणुनी असें स्थिर रहातसे मद्रूपीं चि तसाच ३९

१९ योगी ज्ञानी भक्त भला तो बहु जन्मान्तीं शरण
मज सर्वस्वीं येउनि चुकवी जन्म आणखीं मरण ! ४०

पाहे अथवा निवांत राहे तरी तयातें मीच
सबाह्य-अभ्यंतरीं दिसतसें नसे दुजें कांहींच ४१

आत्मानुभवें जग चि आघवें वासुदेव-मय झालें
बहु दुर्लभ तो महंत विश्वीं विश्व होउनी खेळे !! ४२

२० नर अज्ञानी कामना मनीं धरुनी विविध विधींनीं
अन्य दैवतें उपासिती ते प्रकृति-धर्म अनुसरुनी ४३

२१ श्रद्धेनें जो भजूं इच्छितो दैवत जैसें जें जें
तेथ तयाची तैसी श्रद्धा मी चि दृढ करीं सहजें ४४

२२ अचल श्रद्धा-युक्त होउनी तें दैवत तो पूजी
आणि देवता-द्वारा पावे धरी कामना जी जी ४५

मी फल-दाता असें तत्त्वतां न जाणतां ही खूण
करी भजन तें म्हणुनी न सुटे कर्म-बंधनांतून ४६

२३ ते मंद-मती फळें मिळविती नाशिवंत तीं सहजें
देव-भक्त ते देवांसि तसे मज चि पावती माझे ४७

२४ रूप थोरलें नेणुनि माझें सर्वोत्तम शाश्वतसें
मज अव्यक्ता अज्ञ मानिती इंद्रिय-गोचर ऐसें ४८

सहज-सिद्ध मी असतां मातें बघती साधायातें
अमृत-सागरीं बुडाले तरी तोंड उघडिती न च ते ! ४९

२५ असे चि निरुतें मजसभोंवतें पटल योग-मायेचें
म्हणुनि झांकलें स्वरूप माझें अ-ज अ-व्यय जें साचें ५०

अजाण नर जे सर्वत्र तयां भ्रांति-रूप अंधार
नित्य सर्वगत सन्निध असुनी न दिसें मी साचार ५१

ह्यास्तव माया-पटल पांडवा, ज्ञानें दूर करावें
सर्व-व्यापी मी चि होउनी मजमाजीं चि रहावें ५२

२६ होउनि गेलीं वर्तमान वा जीं जीं भावी भूतें
त्या सर्वांतें मी चि जाणतों कुणी न जाणे मातें ५३

२७ प्रीति-द्वेषामुळें अंतरीं द्वन्द्व-मोह उद्‌भवला
तो चि भारता, मोह घालितो इथे प्राणि-मात्राला ५४

म्हणुनी भ्रमती गुंतुनि जाती नश्वर संसारांत
आणि पावती दुःख दुष्कृती मूढ-मती निभ्रांत ५५

२८ परी पांडवा, पाप जयांचें झडुनी गेलें पूर्ण
आणि जाहले जे पुण्य-बळें सदाचार-संपन्न ५६

तसे निरवधि सुख-दुःखादि द्वन्द्व-मोह-निर्मुक्त
मी चि होउनी भजती मातें दृढ-व्रती ते भक्त ५७

२९ जरा-मरण तें दूर कराया मदाश्रयें जे झटती
जाण निश्चयें तयां होतसे ब्रह्म-पदाची प्राप्ति ५८

तेविं आकळे तयांसि सगळें अध्यात्माचें मर्म
कृतार्थ होती म्हणुनि जाणती संपूर्णपणें 'कर्म' ५९

३० स्वरूप माझें 'साधिभूत' जें तसें 'साधिदैव' हि जें
आणिक सहजें 'साधियज्ञ' जें तें आकळिती जे जे ६०

देही दिसती ते ते असती परी सर्वथा मुक्त
अंत-कालिंहि मला जाणती अचल ठेवुनी चित्त ! ६१

येथें भावार्थ गीतेचा सप्तमाध्याय संपला ।
सारांशें ज्ञान-विज्ञान-योग ह्यांत निवेदिला ॥ ७॥